॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

## परिपत्रक क्रमांक : ६४/२०२१
### (अत्यंत महत्वाचे)

प्रति,

१. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य/मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक.
२. विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक/विभागांचे प्रमुख,कबचौउमवि., जळगाव.
३. सर्व प्रशासकीय विभागांचे विभाग प्रमुख/नियंत्रक अधिकारी, कबचौउमवि., जळगाव.
४. मानद संचालक, विद्यापीठाचे प्रताप तत्वज्ञान केंद्र, अमळनेर.
५. कार्यकारी संचालक, विद्यापीठाचे महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, धुळे.
६. नियंत्रक अधिकारी, विद्यापीठाचे एकलव्य प्रशिक्षण केंद्र, नंदुरबार.

**विषय :-** महाराष्ट्र राज्यात व देशांतर्गत कोविड-१९ विषाणूच्या संसर्गामुळे बाधित झालेल्या व्यक्तींची संख्या मोठ्याप्रमाणात वाढत असल्यामुळे खबरदारी घेण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक उपाययोजनांबाबत.

**संदर्भ:-** १) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हादंडाधिकारी, जळगाव यांचे कार्यालयाकडील आदेश क्र.दंडप्र-०१/कावि/५७१/२०२१ दि.१७/०२/२०२१
२) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक ६३/२०२१ जा.क्र. कबचौउमवि/२/कोरोना (कोविड-१९)/३७/२०२१ दि. १०/०२/२०२१

उपरोक्त संदर्भीय क्र.०१ वर नमूद मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय,जळगाव यांच्या कार्यालयाकडील आदेशाची प्रत ह्या परिपत्रकासोबत जोडलेली आहे. कृपया संदर्भीय आदेशाचे अवलोकन व्हावे व त्यामध्ये नमूद केलेल्या बाबीची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

महाराष्ट्र राज्यात व देशांतर्गत कोविड-१९ विषाणूच्या संसर्गामुळे बाधित झालेल्या व्यक्तींची संख्या मोठ्याप्रमाणात वाढत असल्यामुळे खबरदारी घेण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक उपाययोजना करण्याबाबत मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी दि.१६/०२/२०२१ रोजी झालेल्या व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे निर्देश दिलेले आहेत. तसेच जळगाव, धुळे व नंदूरबार जिल्ह्यात करोना संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता, त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणू संसर्गात अधिक वाढ होऊ न देता आणि सदर संशयित व्यक्तीमुळे आपत्तीजन्य परिस्थिती जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रात उद्भवू नये या साठी कोविड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करणे यासाठी पूर्व तयारी करणे आवश्यक आहे.

तेव्हा, वरील संदर्भीय आदेशानुसार व विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेलया विविध परिपत्रकान्वये विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था, विद्यापीठ प्रशाळा व उपकेंद्रे या मधील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मास्कचा वापर करतात का हे तपासणे, प्रत्येक वर्गात सॅनिटायझर अथवा हात धुण्यासाठी साबण उपलब्ध ठेवणे. संशयीत विद्यार्थ्यांची आरटीपीसीआर चाचणी करून घेणे गरजेचे आहे.

K.B.C. NORTH MAHARASHTRA UNIVERSITY • JALGAON-425001

पुढे..२ वर

उमविनगर, जळगाव - ४२५००१ (महाराष्ट्र) भारत, दुरध्वनी क्र : ०२५७ - २२५८४२८, २२५८४२९ फॅक्स क्र.: ०२५७ - २२५८४०३,४०६
Umavinagar, Jalgaon - 425 001 (Maharashtra) INDIA, Telephone No. 0257 - 2258428, 2258429
Fax No. 0257 - 2258403, 406 Email : registrar@nmu.ac.in Web : www.nmu.ac.in

कोरोना विषाणूच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याबाबत महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले आदेश, नियमावली (SOPs) नुसार कुलसचिव कार्यालयाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले आदेश लागू राहतील. तसेच महाराष्ट्र शासनाकडून लॉकडाऊन कालावधीत लागू केलेले निर्बंध शिथील करण्याबाबत वेळोवेळी दिलेले निर्देश पुढील आदेश होईपावेतो लागू राहतील.

वरील प्रमाणे करोना विषाणू संसर्गाच्या अनुषंगाने सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडावी व संदर्भिय क्र. (०१) व (०२) वर नमुद आदेशाप्रमाणे आपल्या स्तरावरून आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

आदेशावरून,

(प्रा.भा.व्यं.पवार)
**प्र.कुलसचिव**

**सोबत :-** मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हादंडाधिकारी, जळगाव यांचे कार्यालयाकडील आदेशाची प्रत.

जा.क्र.कबचौउमवि/२/ कोरोना(कोविड-१९)/ ५६ /२०२१
दि. १८/०२/२०२१

**प्रत माहितीसाठी.**

१. सन्माननीय सर्व व्यवस्थापन परिषद सदस्य, कबचौउमवि., जळगाव.
२. विविध विद्याशाखांचे मा. अधिष्ठाता, कबचौउमवि., जळगाव.
३. मा. कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, कबचौउमवि., जळगाव.
४. मा. प्र-कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, कबचौउमवि., जळगाव.
५. मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
६. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव.
७.मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि, जळगाव.
८.मा.प्र.वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव.

उमविनगर, जळगाव - ४२५००१ (महाराष्ट्र) भारत, दुरध्वनी क्र : ०२५७ - २२५८४२८, २२५८४२९ फॅक्स क्र.: ०२५७ - २२५८४०३,४०६
Umavinagar, Jalgaon - 425 001 (Maharashtra) INDIA, Telephone No. 0257 - 2258428, 2258429
Fax No. 0257 - 2258403, 406 Email : registrar@nmu.ac.in Web : www.nmu.ac.in

महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

(गृह शाखा)

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001

**दुरध्वनी क्रमांक** - 0257- 2220152 **ई मेल** - homebranchjalgaon@gmail.com

**वाचले** :- 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा,2005

2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897

3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना2020/प्रक्र.58/आरोग्य 5 दिनांक 14 मार्च 2020

4. मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक 16/02/2021 रोजी झालेल्या व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे दिलेल्या निर्देशानुसार

**क्र दंडप्र-01/कावि/571/2021** **दिनांक** 17/02/2021

## आदेश :-

ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च, 2020 अन्वये करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतूदीच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यात व देशांतर्गत कोविड-19 विषाणूच्या संसर्गामुळे बाधित झालेल्या व्यक्तींची संख्या मोठया प्रमाणात वाढत असल्याने खबरदारी घेण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक 16/02/2021 रोजी झालेल्या व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे निर्देश दिलेले आहेत. तसेच जळगांव जिल्हयात करोना संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणू संसर्गात अधिक वाढ होऊ न देता उपाययोजना राबवणे आवश्यक आहे आणि सदर संशयित व्यक्तीमुळे आपत्तीजन्य परिस्थिती जळगांव जिल्हयात उद्भवू नये यासाठी पूर्व तयारी करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, **मी. अभिजीत राऊत, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जळगांव** आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 व भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, 1897 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन जळगांव जिल्हयात करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनांचा भाग म्हणून या कार्यालयामार्फत वेळोवेळी आवश्यक त्या उपाययोजना राबविण्याबाबत निर्गमित करण्यात आलेल्या सुचना विचारात घेऊन पुढील आदेश होईपावेतो खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| अ क्र | कामाचे स्वरुप | जबाबदार अधिकारी यांचे पदनाम |
|---|---|---|
| | अ) वैद्यकीय बाबी | |
| 1 | **Dedicated Covid Health Centre, Covid Care Centre इत्यादींची तपासणी करणे :-**<br>यापूर्वी वापर करण्यात आलेल्या **Dedicated Covid Health Centre, Covid Care Centre** इमारतींची तपासणी करुन त्यामध्ये रुग्णांसाठी आवश्यक साहीत्य हे कुठल्याही क्षणी वापरता येतील अशा स्थितीत आणून ठेवण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करणे. | 1. आयुक्त, जळगांव मनपा<br>2. उपविभागीय अधिकारी (सर्व)<br>3. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय जळगांव<br>4. तहसिलदार (सर्व)<br>5. जिल्हा शल्य चिकीत्सक जळगांव<br>6. मुख्याधिकारी (सर्व)<br>7. वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय (सर्व) |
| 2 | **General Practitioner कडून माहिती घेणे :-**<br>General Practitioner डॉक्टरांचा नियमित आढावा घेऊन त्यांचेकडेस उपचारासाठी येणा-या प्रत्येक रुग्णांची माहिती | 1. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.जळगांव<br>2.जिल्हा शल्य चिकीत्सक जळगांव<br>3.तालुका वैद्यकीय अधिकारी (सर्व) |

| | | |
|---|---|---|
| | घेऊन त्यापैकी लक्षणे असलेल्या संशयीत रुग्णांची माहिती घेऊन त्यांना RTPCR चाचणी करुन घेणे व खाजगी रुग्णालयांना नियमित भेटी देणे. | 4.वैद्यकीय अधिकारी, ग्रामिण रुग्णालय सर्व. |
| 3 | **गृह विलगीकरण/ अलगीकरण (Quarantine) रुग्णांवर नियंत्रण ठेवणे :-**<br>सौम्य / अतिसौम्य लक्षणे असलेल्या कोविड-19 बाधीत किंवा संशयीत रुग्णांच्या संपर्कात असलेल्या व्यक्तींनी गृह विलगीकरण/ अलगीकरणाची रितसर परवानगी घेऊन त्याबाबतच्या नियमांचे पालन करीत आहे किंवा नाही याची तपासणी करणे. | 1. आरोग्य अधिकारी, जळगांव मनपा<br>2. मुख्याधिकारी (सर्व)<br>3. गट विकास अधिकारी (सर्व)<br>4. तालुका वैद्यकीय अधिकारी (सर्व) |
| 4 | **Contact Tracing व Testing :-**<br>कोविड बाधीत रुग्णांच्या संपर्कात असलेल्या High Risk Contact व Low Risk Contact व्यक्तीचा शोध घेणे. तसेच प्रती बाधीत रुग्णांच्या संपर्कातील 20 व्यक्तीच्या शोध घेणे. त्यांना गृह विलगीकरण/ अलगीकरण करणे. बाधीत रुग्णांना विषाणूचा संसर्ग कुठून झाला याबाबत त्या ठिकाणाचा / कार्यक्रमांचा शोध घेणे. | 1. आरोग्य अधिकारी, जळगांव मनपा<br>2. मुख्याधिकारी (सर्व)<br>3. गट विकास अधिकारी (सर्व)<br>4. तालुका वैद्यकीय अधिकारी (सर्व) |
| 5 | **Containment Zone तयार करणे :-**<br>एखादया परीसरात कोविड 19 बाधित रुग्णांच्या संख्येत वाढ होत असल्याचे निदर्शनास आल्यास सदरचा परिसरातील व्यक्तींच्या हालचालीवर निर्बंध लागू करण्यासाठी शासनाने निश्चित केलेल्या धोरणानुसार **Containment Zone** तयार करण्यात यावेत.<br>तसेच **Containment Zone** मधील सुचनांचे उल्लंघन करणा-या व्यक्तींवर नियमानुसार कायदेशीर कारवाई करणे. | 1. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव<br>2. तहसिलदार (सर्व)<br>3. मुख्याधिकारी (सर्व)<br>4. गट विकास अधिकारी (सर्व) |
| 6 | **सिटी स्कॅन सेंटर, खाजगी रेडीओलॉजी / पॅथोलॉजी लॅब इत्यादींची माहिती घेणे :-**<br>सिटी स्कॅन सेंटर, खाजगी रेडीओलॉजी / पॅथोलॉजी लॅब यांनी कोविड-19 संशयीत आढळून येणा-या रुग्णांचे अहवाल जवळच्या ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका यांना पाठवणे बंधनकारक करण्याबाबत कळविणे व सदर ठिकाणी नियमित भेटी देणे. | 1. जिल्हा शल्य चिकित्सक, जळगांव<br>2. आरोग्य अधिकारी, मनपा जळगांव<br>3. सहाय्यक आयुक्त, औषध प्रशासन विभाग, जळगांव<br>4. औषध निरीक्षक, औषध प्रशासन विभाग, जळगांव |
| | **ब) नियंत्रणात्मक बाबी** | |
| 1 | **लग्न समारंभ/ अंत्यविधी व इतर मोठया प्रमाणात गर्दी होणारे कार्यक्रम :-**<br>लग्न समारंभ व अंत्यविधी तसेच इतर मोठया प्रमाणात गर्दी होणारे कार्यक्रमांना नियंत्रित करणे. लग्नसमारंभात एकावेळी 50 पेक्षा जास्त व्यक्ती उपस्थित राहणार नाही याची दक्षता घेणे.<br>**लग्न समारंभासाठी स्थानिक पोलीस स्टेशन व स्थानिक स्वराज्य संस्था यांची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.**<br>मंगल कार्यालय/ लॉन्स/ हॉल च्या ठिकाणी मास्कचा वापर न करणा-या व्यक्ती व 50 पेक्षा जास्त व्यक्ती आढळून आल्यास त्याबाबतची जबाबदारी निश्चित करुन नियमानुसार कारवाई करणे.<br>गर्दीच्या कार्यक्रमांना परवानगी देण्यापूर्वी या कार्यालयाचे दिनांक 04/02/2021 रोजीच्या परिपत्रकानुसार स्थानिक स्वराज्य संस्था व संबंधीत पोलीस स्टेशन यांची पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहील. **जास्त गर्दीच्या कार्यक्रमांना परवानगी नाकारणे.** | 1. पोलीस विभाग<br>2. जळगांव शहर महानगरपालिका.<br>3. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)<br>4. तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी (सर्व)<br>5. पोलीस निरीक्षक (सर्व)<br>6. मुख्याधिकारी, नगर पालिका (सर्व)<br>7. संबंधीत तलाठी<br>8. संबंधीत ग्रामसेवक<br>9. संबंधीत पोलीस पाटील |

| | | |
|---|---|---|
| 2 | **उपहार गृहे / बार / हॉटेल / रेस्टॉरंट व तत्सम ठिकाणे :-** सर्व हॉटेल, रेस्टॉरंट , बार (कॅफे,कॅन्टिन, डायनिंग हॉल,रिसॉर्ट, क्लब मधील बाहेरील F&B लायसन्सधारक युनिट/आऊटलेटसह) इत्यादी आदरातिथ्य सेवा 50% क्षमतेसह सकाळी 09.00 ते रात्री 09.00 पर्यंत सुरु राहतील. याची खातरजमा करणे. | 1. पोलीस विभाग, जळगांव<br>2. जळगांव शहर महानगरपालिका<br>3. मुख्याधिकारी सर्व<br>4. पोलीस निरीक्षक (सर्व)<br>5.अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग जळगांव<br>6.सहा आयुक्त, अन्न प्रशासन विभाग जळगांव |
| 3 | **शाळा/ कॉलेजेस :-** सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विदयार्थी मास्कचा वापर करतात का हे तपासणे, प्रत्येक वर्गात सॅनिटायझर अथवा हात धुण्यासाठी साबण उपलब्ध ठेवणे. संशयीत विदयार्थाची RTPCR चाचणी करुन घेणे | 1. कुलसचिव, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव<br>2. संबंधीत कॉलेजचे प्राचार्य<br>3. शिक्षणाधिकारी माध्य,जि.प.जळगांव |
| 4 | **खाजगी कोचिंग क्लासेस / स्पर्धा परिक्षा केंद्रे :** खाजगी कोचिंग क्लासेस / स्पर्धा परिक्षा केंद्रे इत्यादीच्या ठिकाणी सोशल डिस्टन्सींग, मास्क वापर, सॅनीटायझरचा वापर होत आहे किंवा नाही यांची तपासणी करणे.<br>तसेच सदर ठिकाणी विद्यार्थ्यांनी प्रवेश करण्यापूर्वी सॅनीटायझरचा वापर करणे , हात वारंवार धुणे इत्यादीबाबत सुचना निर्गमित करणे. | 1. जळगांव शहर महानगरपालिका<br>2. शिक्षणाधिकारी माध्य,जि.प,जळगांव<br>3. मुख्याधिकारी सर्व |
| 5 | **भाजीपाला मार्केट / शॉपींग कॉम्प्लेक्स/ मॉल याठिकाणी नियंत्रण :-** गर्दीच्या ठिकाणी मार्केट मध्ये सर्व दुकानदार त्यांचे कर्मचारी, विक्रेते यांनी मास्क लावणे बंधनकारक करणे तसेच प्रवेश द्वाराजवळ सॅनिटायझर उपलब्ध ठेवणे. तसेच सदर ठिकाणी गर्दी नियंत्रित करण्यासाठी एका वेळी केवळ 5 ग्राहकच उपस्थित राहतील याबाबत कार्यवाही करावी. | 1. जळगांव शहर महानगरपालिका<br>2. मुख्याधिकारी, नगर पालिका (सर्व)<br>3. सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती सर्व |
| 6 | **शासकीय कार्यालयातील दक्षता :-** शासकीय कार्यालयात येणा-या प्रत्येक व्यक्तीला मास्क् लावणे बंधनकारक करणे, सॅनिटायझर उपलब्ध ठेवणे अथवा हात धुण्यासाठी साबण उपलब्ध ठेवणे तसेच शासकीय कर्मचा-याने स्वत: मास्क वापरणे. दुपारचे जेवण एकत्रित न करणे. | 1. संबंधीत कार्यालय प्रमुख<br>2. कार्यालयातील कोविड Vigilance अधिकारी |
| 7 | **मास्क न वापरणा-यांना दंड करणे/ गुन्हे दाखल करणे :-** मास्कचा वापर न करणा-या व्यक्तींवर पोलीस विभागामार्फत तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या फिरत्या पथकामार्फत प्रत्येकी रु 500/- दंड आकारणी करण्याबाबत निर्देश देणे. | 1. पोलीस विभाग<br>2. जळगांव शहर महानगरपालिका<br>3. जिल्हा परिषद, जळगांव<br>4. उपविभागीय दंडाधिकारी सर्व<br>5. मुख्याधिकारी, नगर पालिका (सर्व)<br>6. तहसिलदार सर्व<br>7. गट विकास अधिकारी सर्व |
| 8 | **रेल्वे / सार्वजनिक वाहतूक प्रवासी नियंत्रण :-** एस.टी., बसेस, ट्रॅव्हल्स, रिक्षा, कॅब, कालीपीली यांना अनुज्ञेय क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी बसवण्यास बंदी करणे क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी बसल्याचे निर्देशास आल्यास दंडात्मक कार्यवाही करणे तसेच मास्क शिवाय वाहनात प्रवेश नाकारणे.<br>तसेच रेल्वेद्वारे विना मास्क प्रवास करणा-या व्यक्तींवर दंडात्मक कारवाई करणे | 1. पोलीस विभाग<br>2. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव<br>3. नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ<br>4. संबंधित रेल्वे स्टेशन व्यवस्थापक<br>5. संबंधित रेल्वे स्टेशन मास्तर |
| 9 | **सार्वजनिक उद्याने :-** सार्वजनिक उद्याने फक्त (सकाळी 5 ते 9) व्यायाम/ मॉर्निंग वॉक करणा-यांसाठीच खुले ठेवावेत. सदर ठिकाणी गर्दी होणार नाही याची दक्षता घेणे. | 1. जळगांव शहर महानगरपालिका<br>2. मुख्याधिकारी, नगर पालिका (सर्व) |
| 10 | **सिनेमागृहे :-** सिनेमागृहामधील सर्व प्रेक्षक, कर्मचारी यांनी मास्कचा वापर करणे तसेच गर्दीचे नियम पाळणे याची खातरजमा करणे | 1. जळगांव शहर महानगरपालिका<br>2. मुख्याधिकारी, नगर पालिका (सर्व)<br>3. करमणूक कर निरीक्षक सर्व |

वरील प्रमाणे नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांना करोना विषाणू संसर्गाच्या अनुषंगाने सर्वसाधारणपणे जबाबदारी देण्यात आलेली आहे. सर्व समन्वय अधिकारी यांना देण्यात आलेल्या जबाबदारीच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करावी तसेच नियुक्त अधिका-यांनी त्यांचे अधिनस्त मनुष्यबळ व साधन सामुग्रीचा यथोचित वापर करुन त्यांना

सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडावी. तसेच नियुक्त अधिका-यांनी त्यांना नेमुण दिलेली जबाबदारी पार पाडण्यासाठी आवश्यकतेनुसार आपल्या कार्यालयातील इतर अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करावी.

**तसेच वर नमूद ब) नियंत्रणात्मक बाबी मधील अनुक्रमांक 01 ते 10 बाबींसाठी खालील प्रमाणे दंडाची आकारणी करण्यात यावी.**

1) **सार्वजनिक ठिकाणी विनामास्क किंवा नियमांचे उल्लंघन करीत असल्याचे आढळून आल्यास संबंधितांना रुपये 500/- मात्र दंडाची आकारणी करावी .**
2) **अनुक्रमांक 01 ते 10 च्या ठिकाणी नियमांचे उल्लंघन करीत असल्याचे आढळून आल्यास अनुक्रमांक 01 ते 10 चे आस्थापना मालक / चालक यांचेकडून दंडाची आकारणी करावी .**
3) **अनुक्रमांक 01 ते 10 च्या ठिकाणी वारंवार नियमांचे उल्लंघन करीत असल्याचे आढळून आल्यास सदरील आस्थापना सिल तसेच गुन्हे दाखल करण्याची कारवाई करावी.**

कोरोना विषाणूच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याबाबत महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले आदेश, निर्देश, नियमावली (SOPs) नुसार या कार्यालयाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले आदेश लागू राहतील. तसेच महाराष्ट्र शासनाकडून लॉकडाऊन कालावधीत लागू केलेले निर्बंध शिथील करण्याबाबत वेळोवेळी दिलेले निर्देश पुढील आदेश होईपावेतो लागू राहतील.

**सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास सदर बाब ही भारतीय दंड संहिता, 1860 (45) चे कलम 188, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 51 ते 60 तरतुदीनुसार शिक्षेस पात्र राहील.**

सदरचा आदेश हा आज दिनांक १७ /02/2021 रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

जिल्हा दंडाधिकारी जळगांव

**(अभिजीत राऊत)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जळगांव**

**प्रत :- माहितीसाठी सविनय सादर**

1. मा प्रधान सचिव, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय मुंबई
2. मा विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. विभागीय रेल्वे व्यवस्थापक, भुसावळ
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव
3. पोलीस अधिक्षक जळगांव
4. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव
5. कुलसचिव, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव
6. उपविभागीय दंडाधिकारी सर्व
7. कार्यकारी दंडाधिकारी सर्व
8. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव
9. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव
10. जिल्हा शल्य चिकीत्सक, जळगांव
11. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.जळगांव
12. सहायक आयुक्त, औषध प्रशासन विभाग जळगांव
13. उपसंचालक, उच्च शिक्षण विभाग,जळगांव
14. शिक्षणाधिकारी, माध्यमिक, जि.प.जळगांव
15. मुख्याधिकारी सर्व (नगरपालिका/नगरपंचायत)
16. विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, जळगांव
17. जिल्हा माहिती अधिकारी जळगांव
18. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, जळगांव

**प्रत :-** सर्व संबंधितांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी